दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ३ रे अंक १४१ वा गुरूवार दि.२६ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




# मुख्यमंत्र्यांना मराठा आरक्षणापेक्षा स्वतःच्या खुर्चीची जास्त चिंता, नाना पटोलेंचा टोला

मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अपात्रतेची टांगती तलवार आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या आरक्षणापेक्षा स्वतःच्या खुर्चीची जास्त चिंता आहे. तेव्हा मुख्यमंत्री आरक्षण देण्याबाबत काही करतील असे दिसत नाही, असा टोला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी लगावला आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाचे हत्यार उपसले आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना नाना पटोले यांनी राज्य सरकारवर निशाणा म्हणाले, मनोज जरांगे-पाटील यांना पुन्हा उपोषण करावे लागत आहे. त्यामुळे सरकार आरक्षणाबाबत गंभीर नाही हे पुन्हा एकदा दिसून आले आहे. राज्य सरकार आणि केंद्रातील भाजप सरकार हे खोटे बोलून सत्तेत आलेले सरकार आहे. या सरकारने आज महाराष्ट्रात ओबीसी विरुद्ध मराठा, धनगर विरुद्ध आदिवासी असा वाद जाणीवपूर्वक निर्माण करू पहात आहेत, असा आरोप पटोले यावेळी केला.

नाना पटोले म्हणातात, भाजपने २०१४ मध्ये सत्तेत येण्याआधी मराठा, आदिवासी, धनगर, हलबा आणि ओबीसी समाजाला आरक्षणाचे गाजर दाखवले होते. आता केंद्रात भाजपची १० वर्षपासून सत्तेत आहेत. पण आरक्षणाचे आश्वासन पाळू शकले नाहीत. यामुळेच राज्यातील आरक्षणाचा प्रश्न तीव्र गेला आहेत आणि समाज-समाजात भांडणे लावण्याचे काम भाजपकडून सुरू असून त्याचा परिणाम सर्वसामान्यावर होत आहे. यामुळे आज या सर्व समाजामध्ये भाजपविरोधात प्रचंड मोठा आक्रोश निर्माण झाला आहे. पण सरकारला जनभावना समजत नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची खुर्ची राहील की नाही याची खात्री नाही. मुख्यमंत्र्यांच्या शब्दाला किंमत नाही, त्यामुळे ते काय आरक्षण देणार? असा सवाल करत नाना पटोले यांनी आज राज्य सरकारवर टीका केली. केंद्र आणि राज्यातील भाजप सरकारला सत्तेतून हटवल्याशिवाय आरक्षणाचा प्रश्न सुटणार नाही, असेही नाना पटोले म्हटले.

मुख्यमंत्र्यांवर अपात्रतेची टांगती तलवार

मुख्यमंत्र्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची शपथ घेऊन मराठा समाजाला आरक्षण देऊ असे म्हटले आहे. पण शिंदे यांच्या शब्दावर जनतेचा विश्वास राहिलेला नाही. कारण शिंदे सरकारच्या शिष्टमंडळानेच मनोज जरांगे-पाटील यांना शब्द दिला होता.

# मराठा समाज बांधवाच्या भावनांशी आपण एकरूप

लातूर / प्रतिनिधी : -आरक्षणा संदर्भातील मराठा समाजांच्या भावनांशी आपण एकरूप आहोत केंद्र आणि राज्यसरकारने मराठा समाजाला विनावीलंब कायदयाच्या कसोटीवर टिकाणारे आरक्षण दयावे या मागणीला आपला व काँग्रेस पक्षाचा पाठींबा असून या मागणीच्या मंजूरीसाठी आपण कायम प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही,राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूरजिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिली. रेणा सहकारी साखर कारखान्याच्या बॉयलर अग्नीप्रदीपन व १८ व्या गळीत हंगाम शुभारंभ कार्यक्रमासाठी जात असताना रेणापूर तालुक्यातील निवाडा फाटा येथे सकल मराठा समाज आंदोलकांशी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी संवाद साधला. यावेळी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख, माजी आमदार त्रंबक भिसे, माजी चेअरमन यशवंतराव पाटील, आबासाहेब पाटील, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, माजी चेअरमन श्रीपतराव काकडे, चेअरमन सर्जेराव मोरे, व्हा. चेअरमन अनंतराव देशमुख आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, मराठा समाज बांधव उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमित देशमुख यावेळी म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला काँग्रेस पक्षाने पाठिंबा दिलेला आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण हे पक्षाच्या वतीने अधिकृत भुमिका मांडत असून त्यांनी मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाला पक्षाचा पाठींबा जाहीर केलेला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या संदर्भात माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी त्यांच्या कार्यकाळात पहीले पाऊल उचलले होते, त्यांनी या संदर्भात आयोगही नेमला होता. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री असताना त्यांनी मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णही घेतला होता. त्यावेळी त्यांच्या मंत्रीमंडळात मी राज्यमंत्री होतो. त्यांनतर जिल्हाधिकारी कार्यालयात मराठा समाजाला प्रमाणपत्र देण्याच्या कार्यक्रमालाही हजर होतो. सदया मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून आंदोलन करीत असलेले मनोज जरांगे पाटील यांचा आम्हाला आदर आहे, आम्ही मराठा समाजाच्या विचाराशी एकरूप आहोत.







# कनकधारा चॅरीटेबल ट्रस्ट लातूर, तनिष्क गोल्ड शोरुम च्या संयुक्त विद्यमाने नवदुर्गा चा सन्मान कार्यक्रम संपन्न




लातूर :- कनकधारा चॅरीटेबल ट्रस्ट लातूर व तनिष्क गोल्ड शोरूम च्या संयुक्त विद्यमाने नवदुर्गा चा सन्मान कार्यक्रम संपन्न लातूर शहरातील विविध क्षेत्रातील डॉक्टर इंजिनिअर प्राध्यापक टीचर सरपंच नगरसेविका महिलां ना नऊ रुपी दुर्गा समजून त्याचा सत्कार करण्यात आला त्या मध्ये भारतातील नामवंत कंपनी तनिष्क चे नवीन डिझाईन लॉन्च करण्यात आले त्या वेळी तनिष्क गोल्ड शोरूम चे सौ संगीता संजयजी बोरा मॅडम व कनक धारा चॅरी टेबलं ट्रस्ट च्या अध्यक्ष श्रीमती प्रिती प्रशांत सोनकर च्या शुभ हस्ते सर्व महिलांना मानचिन्ह म्हूणन सर्टिफिकेट देण्यात आले त्या वेळी श्रीमती स्वाती ताई जाधव पाटील, श्रीमती विध्याताई पाटील, डॉ ज्योती सूळ मॅडम, श्रीमती प्रिती शाह, सौ शीतल तांदळे, सौ कोमल वायचळकर नगर सेविका,श्रीमती शिल्पा खानापुरकर, सौ पल्लवी ढगे, सौ उर्मिला ढगे फार्मासिस्ट, सौ संगीता पतंगे,सौ आम्रता टाक,उद्योजक डॉ. प्रांजली अडसूळ, प्रिती मिसर, सौ माधुरी माकणीकर मिसेस इंडिया, व मिसेस महाराष्ट्र, सौ प्रीतमताई जाधव, सौ उत्कर्षा भालके,यांचा यथोचित सन्मान करून कार्यक्रम पार पडला

# भारतीय परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडवत लातूरला साजेसा दसरा उत्सव साजरा






लातूर :- अनेक वर्षापासून परंपरा असलेल्या लातूर येथील सामूहिक दसरा महोत्सव यावर्षी अमृत महोत्सव असल्याने ऐतिहासिक शोभा मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीत विविध ढोलताशा पथक, लेझीम पथक, सीआरपीएफचे जवान, घोडे, उंट, पारंपारिक वाद्यवृंदासह सहभागी झालेल्या जिवंत विविध देखाव्यांनी संपूर्ण लातूरकरांचे लक्ष वेधून घेतले होते. दसरा महोत्सव समितीचे स्वागताध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडवीत लातूरला साजेसा असा दसरा महोत्सव मोठ्या उत्साहाच्या आणि जल्लोषाच्या वातावरणात साजरा झाला.

लातूरच्या दसरा महोत्सवाचे यंदा अमृत महोत्सवी वर्ष असल्याने समितीच्या वतीने अत्यंत सुरेख नियोजन करून संपूर्ण कार्यक्रम यशस्वी केले. आर्य समाज लातूर येथे दुपारी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते व इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करून कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. याप्रसंगी ना. बनसोडे, सीआरपीएफचे डीआयजीपी संजीव कुमारजी आणि स्वागताध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शस्त्र पूजन आणि शहरातील विविध क्षेत्रातील कार्यरत व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी लातूरचा ऐतिहासिक दसरा महोत्सव दरवर्षी भव्य दिव्य कसा होईल आणि दसरा मिरवणुक समारोपासाठी मैदान उपलब्ध व्हावे याकरीता आ. रमेशअप्पा कराड यांनी प्रयत्न करावेत असे सांगून उपस्थित जनतेला विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या. गेल्या पन्नास वर्षाची परंपरा लातूरच्या सामुहिक दसरा महोत्सवाने जपली असून ही परंपरा यापुढील काळातही कायम चालू राहणार यात शंका नाही असे सांगून स्वागताध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने या सोहळयाला दैदिप्यमान करण्याचा प्रयत्न केला असून आपली संस्कृती जतन करण्यासाठी यापुढेही सामुहीक दसरा महोत्सवाची परंपरा कायम ठेवू अशी ग्वाही दिली. याप्रसंगी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. आर्य समाज मैदान येथून सायंकाळी निघालेल्या शोभा मिरवणुकीत घोडे, उंट, लाठी, काठी, तलवारबाजी चालवणाऱ्या पन्नास हून अधिक मुला मुलींनी जागोजागी आपली कला सादर केली, बँडपथक, सीआरपीएफचे जवळपास २०० जवानाचे संचलन, अप्रतिम लेझीम पथक, पारंपारिक ढोलताशा पथक, बंजारा समाजातील वेशभूषेसह महिलांचे पथक, दीडशेहून अधिक कलावंताचे विविध देखावे सहभागी झाले होते. जळकोट येथील विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा जिवंत देखावा अनेकांचे लक्ष वेधून घेत होता. वसुंधरा प्रतिष्ठाणच्या वतीने पर्यापुरक देखावा सादर केला. यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह रामायणातील प्रसंगावर आधारीत देखावा साकारला होता. त्याचबरोबर विविध देवीदेवतांच्या वेशभुषेतील बालक अनेकांचे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. या मिरवणुकीत लातूर शहरासह ग्रामीण भागातील अनेक महिला पुरुष तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणूक मार्गावर नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या मिरवणुकीत स्वागत अध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड, महोत्सव समितीचे ग्रामीण अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, शहर अध्यक्ष ईश्वर बाहेती यांच्यासह इतर अनंकांनी उघड्या जीपमधून जनतेला विजयादशमीच्या निमित्ताने हात उंचावून शुभेच्छा दिल्या. एकूणच लातूर शहरात सामूहिक दसरा महोत्सवाची प्रचंड उत्साहाच्या वातावरणात निघालेली शोभा मिरवणूक ऐतिहासिक ठरली.

यशवंत शाळेच्या मैदानावर फटाक्याची आतिषबाजी करून विविध कलापथकांनी आपली कला सादर करून शोभा मिरवणुकीचा समारोप झाला. सामूहिक दसरा महोत्सव यशस्वी व्हावा यासाठी समितीच्या वतीने मेहनत घेण्यात आली. ध्वजारोहण कार्यक्रम, ध्वजारोहण शोभा मिरवणूक आणि समारोप कार्यक्रमास जयप्रकाश दगडे विष्णू भुतडा, ओमप्रकाश पाराशर, हुकुमचंद कलंत्री, धर्मवीर भारती, प्रकाश कासट, रामदास भोसले, श्रीकांत रांजणकर, संतोष तोष्णीवाल, व्यंकटेश हालिगे, शंकरराव मोरे, वैजनाथ आप्पा लातूरे, अमोल नानजकर, दिलीप कानगुडे, विजयकुमार सलगरे, महावीर काळे, गोपाळ बुरबुरे, ओमप्रकाश गोपे, सुरज व्यवहारे, महादेव खंडागळे, हनुमंत कोळेकर नितीन मोहनाळे, शिवराज पानगावे, अभिषेक पतंगे, संजय जमदाडे, राधिका पाटील, मनीषा बोळशेट्टी, योगिता ठाकूर, बाबासाहेब सूर्यवंशी, आकाश गडगळे लक्ष्मण शिंदे संदीप पुणेकर संभाजी कांबळे राजाभाऊ खंडाळे तुषार रेड्डी यांच्यासह सामाजिक, राजकीय, उद्योजक, व्यापारी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, तरुण, महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## संपादकीय....

# सरळमार्गी वळणदार

विविध भूमिकांमधून क्रिकेटशी संबद्ध राहिलेल्या बिशनसिंग बेदींची मूल्ये आणि निष्ठा कधीही विचलित झाल्या नाहीत. क्रिकेटपटू, कर्णधार, प्रशिक्षक, प्रशासक, समालोचक अशा विविध भूमिकांमधून क्रिकेटशी संबद्ध राहिलेल्या बिशनसिंग बेदींची मूल्ये आणि निष्ठा कधीही विचलित झाल्या नाहीत. बिशनसिंग बेदी यांची डावखुरी गोलंदाजी म्हणजे जणू अनेक नैपुण्यांचा एकत्रित आविष्कारच. पदलालित्य, मनगटावरील नियंत्रण, अंगुलीकला, एकाग्रता, आत्मविश्वास आणि या सर्वांच्या जोडीला दिलेर स्वभाव 'पोएट्री इन मोशन' असे त्यांच्या नितांतसुंदर आणि वैशिष्ट्यपूर्ण गोलंदाजी शैलीचे यथार्थ वर्णन इंग्लिश क्रिकेट समीक्षकांनी केले होते. छोटीशीच धाव घेत एखाद्या नर्तकासारखा शरीराला झोक देत बेदी चेंडूला गती, उंची, दिशा आणि वळणही द्यायचे. प्रत्येक चेंडूच्या वेळी या सर्व क्रिया वेगवेगळ्या तीव्रतेने आणि नजाकतीने सादर व्हायच्या. फिरकी गोलंदाजी करतानाची बेदींची स्थिरचित्रे त्यामुळे एखाद्या निष्णात नर्तकाच्या मुद्रेसारखी भासतात. ती पाहताना आज जसे आपण खिळून जातो, तसे त्या काळी फलंदाजही खेळपट्टीवर खिळून जायचे. खरे तर त्या काळातील अनेक गोऱ्या क्रिकेट लेखकांच्या नजरेतून भारतीय क्रिकेटपटू म्हणजे कारागीर/कलाकार अधिक आणि खेळाडू कमी असायचे. म्हणजे बोटांत नि मनगटात कला आहे. त्यातून औटघटका मनोरंजन होणार हेही ठरलेले. पण ही मंडळी विजयी म्हणता येऊ शकत नव्हती. बिशनसिंग बेदींनी हा समज मुळासकट उखडून टाकला. भारतीय फिरकी गोलंदाजी हे गोऱ्या किंवा गौरेतर तेज गोलंदाजीइतकेच विध्वंसक अस्त्र ठरू शकते हे त्यांनी जगासमोर सिद्ध केले. त्यांच्या आधी वा नंतर असंख्य फिरकी गोलंदाज झाले. यांतील काही बेदींपेक्षा अधिक यशस्वी ठरले. पण एखाद्या देशाचा सामूहिक हुंकार ज्या पद्धतीने बेदींनी मांडला, तसा तो क्वचितच इतर कोणास मांडता आला. याचे कारण म्हणजे बिशनसिंग बेदी हे निव्वळ मैदानावरील फिरकी गोलंदाज नव्हते. मैदानातील त्यांच्या रंगीत फेट्यांप्रमाणेच बेदींच्या व्यक्तिमत्त्वाचे रंगही अनेक होते. या रंगांनी भारतीय क्रिकेटचा पोत बदलला. निष्ठा आणि नैतिकता यांचे पालन कालातीत आणि स्थलातीत असते हे निक्षून सांगत बेदी त्यानुसार अखेरपर्यंत वागत राहिले. शिष्टसंमत शाब्दिक बुडबुड्यांची पखरण करण्याऐवजी चार स्पष्ट शब्द समोरच्याला ऐकवणे केव्हाही हितकारक, असा त्यांचा रांगडा पंजाबी खाक्या होता. त्यामुळे ते बहुतेक आजी–माजी भारतीय खेळाडूंपेक्षा वेगळे दिसतात आणि ठसठशीत वाटतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंची आणि रंगांची त्यामुळे स्वतंत्र दखल घेणे भाग पडते. बेदी–प्रसन्ना–चंद्रा आणि वेंकट या सुप्रसिद्ध फिरकी चौकडीपैकी बेदी एक. चौघांमध्ये ते एकमेव डावखुरे फिरकी गोलंदाज आणि एकमेव उत्तर भारतीयही. वेस्ट इंडिजने १९७०च्या उत्तरार्धात तेज गोलंदाज चौकडी वापरून क्रिकेट विश्वाला दहशतीत टाकण्याच्या आधी भारतीय फिरकी चौकडीने जगभरातील फलंदाजांची भंबेरी उडवण्यास सुरुवात केली होती. फिरकी चौकडीपैकी दोघे ऑफस्पिनर (प्रसन्ना व वेंकट) होते, एक लेगस्पिनर (चंद्रा) होता. यांच्या तुलनेत बेदींसारख्या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजासमोर बळी मिळवण्याचे आव्हान खडतर होते. पण बेदी त्या चौकडीचे अघोषित नायक होते. कारण दाक्षिणात्य नेमस्तपणा त्यांच्या ठायी नव्हता. मात्र ते असभ्यही नव्हते. इंग्लंड आणि वेस्ट इंडिजमधील भारताच्या पहिल्या कसोटी मालिकाविजयात त्यांचे योगदान अमूल्य होते. जगाच्या कानाकोपऱ्यातील कोणत्याही मैदानावर त्यांची फिरकी गोलंदाजी खणखणीत यशस्वी ठरली. प्रदीर्घ काळ इंग्लिश कौंटी क्रिकेट खेळणाऱ्या मोजक्या गौरेतर फिरकी गोलंदाजांपैकी ते एक. कसोटी क्रिकेटमध्ये त्यांनी २६७ बळी मिळवले, पण प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्यांनी मिळवलेले १५०० हून अधिक बळीदेखील तितकेच उल्लेखनीय ठरतात. निव्वळ बचावात्मक गोलंदाजी करून धावा वाचवण्यापेक्षा गडी बाद करण्याकडे त्यांचा कल असे. यासाठी प्रसंगी धावा मोजण्याचीही त्यांची तयारी असे. 'सचिन माझ्या गोलंदाजीच्या चिंधड्या उडवतो तेव्हा काय करू?' या शेन वॉर्नच्या अगतिक प्रश्नावर 'तो फटके मारतो तर तुझ्या गोलंदाजीवर बादही होऊ शकतो' असा दिलासा बेदींनी दिला होता. फिरकी गोलंदाजाने प्रयत्न करत राहिले पाहिजे आणि यासाठी त्याचे हृदय विशाल पाहिजे, असे बेदी यांचे मत. आज असे विशालहृदयी गोलंदाजच काय; पण खेळाडूही आढळत नाहीत आणि त्यांना तशी मुभा देऊ धजणारे कर्णधार तर आणखी दुर्मीळ बनले आहेत. क्रिकेट संस्कृतीमधील हा बदल बेदींनी पाहिला, पण स्वीकारला मात्र नाही! त्या अर्थी ते क्रिकेटच्या विश्वातले स्वप्नाळू (रोमँटिक) ठरतात. क्रिकेटच्या सभ्य मूल्यांवर त्यांची प्रगाढ श्रद्धा होती. क्रिकेट हा निव्वळ खेळ आहे. ते युद्ध नव्हे, हे त्यांचे मत. त्यामुळेच मैदानावर त्यांच्यासमोर चाचपडणाऱ्या प्रतिस्पर्धी फलंदाजाला नेट सरावादरम्यान युक्तीच्या गोष्टी सांगण्यात बेदींना कोणतीही असुरक्षितता वाटली नाही. क्रिकेट आनंदासाठी खेळावे, पण नैतिक मूल्यांना अंतर देण्याची गरज नाही हे त्यांचे तत्त्वज्ञान. ते प्रत्येकाला झेपेल असे नव्हे. मुंबई क्रिकेट आणि मुंबईकर क्रिकेटपटूंविषयी त्यांची स्वत:ची धारणा होती. हे क्रिकेट बचावात्मक आणि आत्मकेंद्री असते, असे त्यांचे निरीक्षण. त्याचा प्रतिवादही इथल्यांनी वेळोवेळी केलेला आहे. काही वेळा भावनेच्या भरात त्यांनी टोकाची वक्तव्येही केली.

# आता 'इंडिया'चे काय होणार?

मध्य प्रदेशमधील काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या भांडणात विरोधकांच्या 'इंडिया'चे काय होणार असा प्रश्न या महाआघाडीतील घटक पक्षांना पडू लागला आहे. महेश सरलष्कर घटक पक्षांचे राजकीय बळ अनेक राज्यांत 'इंडिया'ला तारूनही नेईल; पण मध्य प्रदेशात समाजवादी पक्ष आणि यांच्यात झालेला बेबनाव लोकसभेसाठी उत्तर प्रदेशात महागात पडू शकतो.. मध्य प्रदेशमधील काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या भांडणात विरोधकांच्या 'इंडिया'चे काय होणार असा प्रश्न या महाआघाडीतील घटक पक्षांना पडू लागला आहे. 'इंडिया'च्या घटक पक्षांतील मतभेदांमुळे भाजपला आनंदाच्या उकळ्या फुटू शकतात. घटक पक्ष म्हणतात की, काँग्रेसने मोठ्या मनाने सगळ्यांना सामावून घेतले पाहिजे. तर काँग्रेसचे म्हणणे आहे की, मध्य प्रदेशमधील एक–एक जागा महत्त्वाची आहे. काँग्रेसला अनुकूल परिस्थिती असेल तर 'सप'ला जागा द्यायच्या कशाला? भाजपला हरवण्याची संधी चालून आली असेल तर त्यात इतर पक्षांना वाटेकरी कशाला करायचे, असा विचार काँग्रेसने केलेला दिसतो. म्हणूनच काँग्रेसचे मुख्यमंत्रीपदाचे दावेकरी कमलनाथ यांनी, 'कोण ते अखिलेश–वखिलेश?', असे विधान करून 'सप'चे प्रमुख अखिलेश यादव यांच्या आरोपांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले असावे. त्यावर, काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न केल्यामुळे कमलनाथ यांना दिल्लीकरांचा पाठिंबा असल्याचे स्पष्ट झाले आहे.काँग्रेसच्या या अरेरावीमुळे 'इंडिया'तील घटक पक्ष काहीसे नाराज झालेले आहेत. समाजवादी पक्षाचे म्हणणे होते की, भाजपला पराभूत करण्यासाठी 'इंडिया'ची स्थापना झाली असेल तर, ही महाआघाडी राज्यांमध्येही झाली पाहिजे. मध्य प्रदेशमध्ये जिथे 'सप'चे उमेदवार जिंकण्याची शक्यता असतील अशा पाच–सहा जागा आम्हाला द्या. बाकी तुम्ही लढवा! पण, काँग्रेसने 'सप'चे ऐकलेले नाही. उत्तर प्रदेशमध्ये 'सप'ने जशास तसे वागायचे ठरवले तर काँग्रेस काय करणार, असे विचारले जाऊ शकते.'इंडिया'च्या मुंबईतील बैठकीनंतर प्रामुख्याने काँग्रेसचे लक्ष पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकीकडे केंद्रित झाले आहे. राहुल गांधींच्या 'भारत जोडो' यात्रेला मिळालेल्या प्रतिसादानंतर आणि कर्नाटकच्या विजयानंतर मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा या चारही मोठ्या राज्यांमध्ये काँग्रेसला यशाची खात्री वाटू लागली आहे. मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये सत्ता मिळू शकेल, राजस्थानमध्ये तुल्यबळ लढाई होईल, असे राहुल गांधींनी एका जाहीर कार्यक्रमामध्ये सांगितले होते. तेलंगणामध्ये रेवंत रेड्डी यांच्याकडे सर्वाधिकार दिल्यानंतर काँग्रेसने राज्यातील वातावरण बदलून टाकल्याचे सांगितले जाते. आत्ता–आत्तापर्यंत काँग्रेसमधून नेते भारत राष्ट्र समिती (बीआरएस) वा भाजपमध्ये जात होते. आता 'बीआरएस'मधून नेते काँग्रेसमध्ये येऊ लागले आहेत. भाजपने कितीही गाजावाजा केला तरी तेलंगणामध्ये त्यांची डाळ शिजण्याची शक्यता नाही असे विश्लेषकांचे म्हणणे आहे. इथे लढाई 'बीआरएस' आणि काँग्रेस यांच्यामध्ये होणार असून लोकांच्या नाराजीचा काँग्रेसला मोठा लाभ मिळेल असे पक्षाला वाटते. मिझोरमसह पाचही राज्यांमध्ये सत्ता मिळण्याची आशा काँग्रेसला वाटू लागल्याने काँग्रेसचे 'इंडिया'कडे दुर्लक्ष झालेले आहे. या राज्यांमध्ये काँग्रेसने चांगली कामगिरी केली वा त्यांची सत्ता स्थापन झाली तर आगामी लोकसभा निवडणुकीतही यश मिळेल असा विचार काँग्रेस करत आहे. त्यांच्या या राजकीय मांडणीमध्ये तथ्यही असू शकते. गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड या राज्यांमध्ये काँग्रेसला भाजपशी लढावे लागेल. उत्तरेतील सुमारे २०० लोकसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेस विरुद्ध भाजप अशी थेट लढाई होणार आहे. या जागांवर काँग्रेसला अधिकाधिक जागांवर भाजपचा पराभव करता आला तर केंद्रातील सत्तेचे गणित पूर्णपणे बदलू शकते. या दोनशे जागांवर काँग्रेसला 'इंडिया'च्या घटक पक्षांची फारशी गरज नाही.महाराष्ट्रातील महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसचा समावेश आहे, तिथे जागावाटपाची चर्चा सुरू आहे. गुजरातमध्ये काँग्रेसला कदाचित आम आदमी पक्षाची मदत लागू शकते. तिथल्या विधानसभेत 'आप'ने काँग्रेसचे नुकसान केले होते. मतविभागणी टाळायची असेल तर काँग्रेस व 'आप'ला गुजरातमध्ये तडजोड करावी लागेल. इथे काँग्रेसने सामंजस्याची भूमिका घेतली तर 'आप'ही दिल्लीत काँग्रेसला सातपैकी दोन वा तीन जागा देऊ शकतो. तसे झाले तर गुजरात व दिल्ली या दोन्ही राज्यांमध्ये भाजपला तगडे आव्हान देता येऊ शकते. पंजाबमध्ये हे दोन्ही पक्ष एकमेकांविरोधातच लढतील. दक्षिणेत केरळ व पश्चिम बंगालमध्ये 'इंडिया'तील घटक पक्षांमध्ये आघाडी होणार नाही. केरळमध्ये काँग्रेस व माकप एकमेकांविरोधात लढतील. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस व माकप–काँग्रेस एकमेकांविरोधात लढतील. काही जागांवर छुपी युती होऊ शकते. तमिळनाडूमध्ये द्रमुक–काँग्रेस युती आहेच. कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेशमध्ये 'इंडिया'तील फक्त काँग्रेसचे अस्तित्व आहे. झारखंडमध्ये काँग्रेस व झारखंड मुक्ती मोर्चामध्ये जागावाटप होऊ शकते. या सगळ्या राज्यांमध्ये काँग्रेसने जागावाटपाची बोलणी सुरू केली आहेत किंवा तडजोडीची तयारी दाखवलेली आहे.आता प्रश्न उरला आहे तो उत्तर प्रदेश आणि बिहारचा. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला यश मिळाले तर उत्तर प्रदेशात काँग्रेस समाजवादी पक्षाकडून वीस–पंचवीस जागांची तरी मागणी करेल. मध्य प्रदेशमध्ये मिळालेल्या अपमानास्पद वागणुकीमुळे समाजवादी पक्ष इतक्या जागा काँग्रेससाठी सोडण्याची शक्यता नाही. बहुजन समाज पक्ष 'तटस्थ' राहील; त्याचा लाभ भाजपला मिळू शकेल. त्यामुळे उत्तर प्रदेशमध्ये 'इंडिया'चे ऐक्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशमध्ये उच्चवर्णीयांनी भाजपकडे पाठ फिरवलेली नाही. 'सप'च्या मुस्लीम–यादव समीकरणामुळे ओबीसींचा अपेक्षित पाठिंबा 'सप'ला मिळाला नसल्याचे गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत स्पष्ट झाले होते. अनेक ओबीसी–दलित जातींनी 'सप'कडे पाठ फिरवली होती. उत्तर प्रदेशात काँग्रेसच्या अवस्थेमध्ये फार फरक पडला नसला तरी, या पक्षाने मुस्लिमांकडे नजर वळवली आहे. भाजपविरोधात जिंकणाऱ्या पक्षाला मुस्लीम मतदान करतात. 'सप'ला भाजपकडून सत्ता हिसकावून घेता आलेली नाही. काँग्रेसला इतर राज्यांमध्ये मुस्लिमांचा प्रतिसाद मिळत असेल तर उत्तर प्रदेशातील मुस्लीम काँग्रेसचा विचार करणारच नाहीत असे नव्हे. त्यामुळे उत्तर प्रदेशात 'इंडिया'ची युती महत्त्वाची असेल. लोकसभेच्या इथल्या ८० जागांपैकी किती जागा सप आणि काँग्रेस ताब्यात घेऊ शकतील, त्यावर भाजपची केंद्रातील ताकद अवलंबून राहील. बिहारमध्ये जनता दल (संयुक्त) व राष्ट्रीय जनता दल यांच्या आघाडीत काँग्रेसचे स्थान दुय्यम आहे. इथल्या आघाडीत दोन प्रादेशिक पक्ष जितक्या जागा देतील तेवढ्यावर काँग्रेसला समाधान मानावे लागेल. बिहारमधील जातनिहाय जनगणनेचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर अतिमागास आणि मागास समीकरणाचा लाभ कोणाला मिळतो यावर आघाडीचे पारडे जड होईल की भाजपचे हे ठरेल. त्यामुळे काँग्रेससाठी उत्तर प्रदेशच अधिक महत्त्वाचा असेल.'एकास एक' नाहीच? भाजपविरोधात एकास एक उमेदवार देण्याची शक्यता आता मावळू लागली आहे. त्यामुळे माकप, तृणमूल काँग्रेस या पक्षांनी 'इंडिया'ला फारसे महत्त्व न देण्याचे ठरवले असावे. 'इंडिया'च्या समन्वय समितीमध्ये 'माकप'ने प्रतिनिधी पाठवलेला नाही. 'माकप'ची ताकद असलेल्या राज्यांमध्ये जागावाटपाचा प्रश्न उद्भवत नाही. तृणमूल काँग्रेसची ताकद फक्त पश्चिम बंगालमध्ये आहे, तिथेही एकास एक उमेदवार दिले जाणार नाहीत. त्यामुळे तृणमूल काँग्रेसलाही 'इंडिया'ची गरज नाही. बिहारमध्ये भाजपेतर महाआघाडीचे गणित पक्के झालेले आहे. उत्तरेतील दोनशे जागांवर काँग्रेसलाच भाजपविरोधात लढायचे आहे, तिथे प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य नाही. त्यामुळे 'इंडिया'शिवाय काँग्रेसला लढावे लागेल. ज्या राज्यांमध्ये जागावाटपाची शक्यता आहे तिथे काँग्रेस बोलणी करत आहे. 'इंडिया'च्या नेत्यांना भाजपविरोधात देशभर वातावरण निर्मिती करायची असेल तर संयुक्त सभा घेता येतील. त्याहून अधिक लाभ 'इंडिया'तील घटक पक्ष एकमेकांना देऊ शकत नाहीत. त्याला उत्तर प्रदेश अपवाद असेल. त्यामुळे इथे सप व काँग्रेसची जागांची देवाणघेवाण एकमेकांना साह्यकारी ठरेल. पण, मध्य प्रदेशमध्ये संबंध ताणले गेल्याने उत्तर प्रदेशातील सप व काँग्रेस यांच्यामधील तडजोडीवर परिणाम होण्याची शक्यता दिसू लागली आहे.

# कौटुंबिक हिंसाचार का आणि कसे घडते?

(राष्ट्रीय कौटुंबिक स्त्रीहिंसाचार प्रतिबंधक कायदा दिन विशेष.)

माताभगिनी व लेकीबाळींवर होणाऱ्या कौटुंबिक छळास प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाने कायदा लागू केला. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम–२००५ व नियम–२००६ हे संपूर्ण भारतात दि.२६ ऑक्टोबर २००६पासून लागू केले आहे. कायद्याची माहिती नसेल तर त्याचा पीडित भगिनी लाभ घेवू शकत नाही. शास्त्र पुराणातही स्त्रीला स्त्रीशक्ती–आदिशक्ती म्हणून गौरविण्यात आले आहे. देवी शारदा, नवदुर्गा, एकवीरा, लक्ष्मी आदी सर्व ही स्त्रीशक्तीची रुपे आहेत. प्रापंचिक लोक नवरात्रोत्सवात नवरुपांची, दिवाळीत लक्ष्मीची पूजा मोठ्या भक्तिभावाने करतात. भाऊबीजेस बहिणींचा सन्मान–सत्कार करतात. मग मात्र कुटुंबातील स्त्रीची दैना व अवहेलना का केली जाते? घरी महिलांचा मान–मरातब राखू, तेव्हाच आपले देवी व्रत व लक्ष्मी पूजन कार्यसाधक सिद्ध होईल, अन्यथा पालथ्या घागरीवर पाणी... कौटुंबिक हिंसाचार कशास म्हणावे? ते सर्वसामान्यांना कळवावे, याच शुद्ध हेतुने हा अल्पसा प्रयत्न बापू ऊर्फ श्रीकृष्णदास निरंकारीजी यांनी या लेखप्रपंचातून केलेला आहे... संपादक.

सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वाथ साधिके।
शरण्य त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते।।

वास्तविक स्त्री ज्या परिवारासोबत वा साथीदारासोबत एकाच छताखाली रहात असेल आणि तिचा छळ त्या पुरुष वा परिवाराकडून होत असेल तर ती कौटुंबिक हिंसाचार कायद्यान्वये न्याय दंडाधिकाऱ्याकडे संरक्षण मागू शकते. थोडक्यात पीडित महिला व तिच्या मुलांना निवासाच्या अधिकारासह तिच्या सुरक्षितेचा किंवा आर्थिक संरक्षणाचा आदेश न्यायदंडाधिकारी देवू शकतात. छळापासून संरक्षण मग ते शारीरिक, लैंगिक, आर्थिक, तोंडी किंवा भावनिक अत्याचार असोत, महिलांना त्याविरुद्ध न्याय मागता येतो. शारीरिक छळ म्हणजे काय? तर मारहाण, थोबाडीत हाणणे, तडाखा देणे, चावणे, लाथ मारणे, गुद्दे मारणे, ढकलणे, लोटणे, जोराचा धक्का मारणे, इतर कोणत्याही पध्दतीने शारीरिक दुखापत किंवा वेदना देणे. अशा बाबींचा शारीरिक छळात समावेश होतो. भगिनींना यातून मोलाचा हा सल्ला–

पडला पदर खांदा तुझा दिसतो ग! कमरेला कमरपट्टा कसतो ग बाई कसतो!! तुझ्या तरुणपणाला ग धार! मार भिवईंची काळी कट्यार!! घाव वर्मावरी असा बसतो!!!

तोंडी व भावनिक अत्याचार जसे की अपमान करणे, वाईट नावाने बोलावणे, चारित्र्याबद्दल संशय घेणे, मुलगा झाला नाही म्हणून अपमानास्पद वागणूक देणे, हुंडा आणला नाही म्हणून अतोनात शिव्याश्राप देणे. महिलेला वा तिच्या ताब्यात असलेल्या अपत्यास शाळेत, महाविद्यालयात किंवा इतर शैक्षणिक संस्थांमध्ये जाण्यास मज्जाव करणे, नोकरी स्वीकारण्यास व करण्यास मज्जाव करणे, अपत्यासह स्त्रीला घरातून बाहेर जाण्यास अटकाव करणे, नेहमीच्या कामासाठी कोणत्याही व्यक्तीबरोबर भेटण्यास मज्जाव करणे, तिला विवाह करावयाचा नसल्यास विवाह करण्यास बाध्य करणे, तिच्या पसंतीच्या व्यक्तीसोबत लग्न करण्यास मज्जाव करणे, त्याच्या अथवा त्यांच्या पसंतीच्या व्यक्तीबरोबर विवाह करण्यास जबरदस्ती करणे, आत्महत्येची धमकी देणे, इतर कोणतेही भावनात्मक किंवा तोंडी अपशब्द वापरणे या गोष्टींचा समोवश होतो. लैंगिक अत्याचारामध्ये बलात्कार, अश्लिल फोटो काढणे, बिभत्स कृत्य जबरीने करावयास लावणे, समाजात नाचक्की– बदनामी होईल, असे अश्लील चाळे करणे किंवा अनैसर्गिक अश्लिल कृत्य करणे याबाबींचा समावेश होतो. ती लावण्याची खाण, तिचे आकर्षक पण कोमल रुप वाटत असले तरी प्रसंगी ती ज्वाला, दुर्गा, महाकालीचे रौद्र रुप घेऊ शकते किंवा कायद्याने लढून जिंकू शकते–

रूप माझं चंद्राचं पहा लाख मोलाचं। चंद्राची कोर मी तारांगणी।।
लुकलुकत्या तार्यांत डुलते तोर्यात। शोभते शुक्राची मी चांदणी रे।।

कौटुंबिक हिंसाचार म्हणजे शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता घेण्यासाठी महिलेला अपमानित करणे, तिला शिवीगाळ करणे, विशेषत: अपत्य प्राप्ती न झाल्याच्या सबबीखाली तिला हिणवणे, धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे किंवा पीडितेचा जीव धोक्यात आणण्यास भाग पाडणे. तसेच तिच्या कोणत्याही नातेवाईकाकडे हुंड्याची मागणी करणे. या सर्व गोष्टींचा दुष्परिणाम पीडित व्यक्ती अथवा तिच्या नातेवाईकांवर होणे तसेच आर्थिक छळ करणे. म्हणजे महिलेचे स्वत:चे उत्पन्न, स्त्रीधन, मालमत्ता, इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासून तिला वंचित करणे आणि घराबाहेर काढणे या सर्व बाबींना कौटुंबिक हिंसाचार म्हटले जाते. त्याचप्रमाणे आर्थिक अत्याचारात हुंड्याची मागणी करणे, तिला मुलांच्या पालन–पोषणासाठी पैसे न देणे, तिच्या मुलांना अन्न, वस्त्र, औषधे आदी न पुरविणे, नोकरीला मज्जाव करणे, नोकरीवर जाण्यासाठी आडकाठी निर्माण करणे, नोकरी स्वीकारण्यास संमती न देणे, पगार किंवा रोजी–मजूरीतून आलेले पैसे काढून घेणे, तिला तिचा पगार, रोजगार वापरण्यास परवानगी न देणे, राहत्या घरातून हाकलून देणे, घराचा कोणताही भाग वापरण्यास किंवा घरात जाण्या–येण्यास अडथळा निर्माण करणे, घरातील नेहमीचे कपडे, वस्तू वापरण्यापासून रोखणे, भाड्याच्या घराचे भाडे न देणे या बाबींचा समावेश होतो. तिला तिच्या हक्कांपासून परावृत्त करता कामा नये, तिचा आदर करणेच योग्य–

यादेवी सर्वेभूतेषू मातृरूपेण संस्थितः।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।

काय आहे कौटुंबिक हिंसाचारास प्रतिबंध घालणारा कायदा? स्त्रीचा जन्मच मुळी अत्याचार सोसण्यासाठी झाला, अशी समाजमनाची धारणा आहे. या धारणेला गरीब, श्रीमंत, जात, धर्म, पंथ, शिक्षित, अशिक्षित, ग्रामीण, शहरी, नोकरदार, बेरोजगार असा कुठलाही अपवाद नाही. स्त्री–पुरुष समानता ही केवळ आपण आधुनिक विचारसरणीचे आहोत, हे दाखविण्यापुरतीच सीमित आहे. वास्तव तर नेमके याच्या उलट आहे. भारतीय संविधानाच्या कलम १४ अनुसार भेदभावापासून मुक्ती, कलम १५ अन्वये स्त्री–पुरुष समानता आणि कलम २१प्रमाणे जीवित व स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचा हक्क महिलांनाही दिला आहे. तरीही बहुसंख्य भगिनी कौटुंबिक हिंसाचारास बळी पडत आहेत. त्यांची प्रतिष्ठा सांभाळली जात नाही. समाजसुधारक, स्त्रीउद्धारक आणि विचारवंतही आजवर समाजाचे पूर्ण मानसिक परिवर्तन करू शकलेले नाहीत. समाजात सुधारणा करण्यासाठी केवळ प्रबोधने पुरेसे नाहीत. शिक्षा किंवा दंडशक्तीही तितकीच महत्वाची आहे, म्हणून कौटुंबिक हिंसचारास प्रतिबंध करणारा हा कायदा केंद्र सरकारने केला. कारण–

यत्र नार्येस्तु पूजंतै, रमतै तत्र देवतः!!

या कायद्याद्वारे पीडित महिलेला न्याय, संरक्षण मिळू शकते. या कायद्याच्या आधारे पीडित महिला ही तिच्या अथवा तिच्या मुलांविरुद्ध होणारे अत्याचार थांबवू शकते. स्त्रीधन, दागदागिने, कपडे इत्यादींवर ताबा मिळवू शकते. संयुक्त खाते अथवा लॉकर हे हिंसा करणाऱ्या पुरुषाला वापरण्यास प्रतिबंध करू शकते. स्त्री ज्या घरात राहत असते, ते घर सोडावे लागणार नाही. अत्याचारी पुरुषास ती राहात असलेले घर विकण्यास प्रतिबंध होऊ शकतो. वैद्यकीय उपचाराचा खर्च मागू शकतो. भावनिक व शारीरिक हिंसाचाराबद्दल नुकसान भरपाई स्त्रीला मागता येते. त्याचप्रमाणे पीडितेला मोफत कायदेविषयक केंद्राद्वारे सल्ला, सेवा पुरविणाऱ्या संस्था, वैद्यकीय सुविधा, निवासगृह आदींमार्फत आवश्यक त्या सेवा सुविधा प्राप्त करुन घेता येतात. भारतीय दंड संहिता ४९८–अ कलमाखाली पोलिसात तक्रार दाखल करता येते. तद्वतच भारतीय दंडसहितेच्या कलम १२५अंतर्गत मिळणाऱ्या पोटगी व्यतिरिक्त अतिरिक्त पोटगी ही स्वत:साठी व स्वत:च्या अपत्यासाठी मागता येते. या कायद्यांतर्गत कौटुंबिक हिंसाचाराने पीडित पत्नी, सासू, बहिण, मुलगी, अविवाहित स्त्री, आई, विधवा इत्यादी म्हणजे लग्न, रक्ताचे नाते, लग्न सदृश्य संबंध– लिव्ह इन रिलेशनशीप, दत्तकविधी अशा कारणाने नाते संबंध असणाऱ्या व कुठल्याही जाती धर्माच्या स्त्रिया तसेच त्यांची अठरा वर्षाखालील मुले दाद मागू शकतात. या कायद्यांतर्गत छळ होत असलेली किंवा झालेली स्त्री सरंक्षण अधिकाऱ्याला, सेवा पुरविणाऱ्या संस्थांना, तसेच पोलीस स्टेशन किंवा दंडाधिकाऱ्याकडे तोंडी किंवा लेखी तक्रार करू शकते, हे लक्षात घ्यावे व सजग व्हावे. योगायोगाने याच दिवशी भाऊबीज आली आहे. फक्त सण उत्सवापूरता स्त्रीसन्मान न राखता तो सदोदित अंगवळणी पाडला पाहिजे–

नवलाख दिवे हे निळ्या आभाळी, वसुंधरा अशी चंद्रा ओवाळी। नक्षत्रांचा सर येई भूमीवर, पसरी पदर भेट घ्याया।। चंद्र वसुधेला सखा रे भेटला, पाठीशी राहु दे छाया रे। वेड्या बहिणीची रे वेडी माया।।

!! समस्त लेकीबाळी, माता व भगिनींना राष्ट्रीय कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा दिनाच्या सजग हार्दिक शुभेच्छा !!

– संकलक व शब्दांकन –
बापू ऊर्फ श्रीकृष्णदास निरंकारी.
द्वारा– प. पू. गुरूदेव हरदेव कृपानिवास.
मु. एकता चौक, रामनगर वॉर्ड नं.२०, गडचिरोली.
पो. ता. जि. गडचिरोली (४४२६०५).
मोबा. ७४१४९८३३३९.

# विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखाना येथे बॉयलर अग्नी प्रदीपन व गळीत हंगामाचा शुभारंभ संपन्न

विलास नगर:-- विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा ३७वा गळीत हंगाम २०२३- २४ साठीचा बॉयलर अग्नी प्रदीपन व गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून गळीत हंगामाचा शुभारंभ माजी मंत्री तथा कारखान्याचे चेअरमन सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब, माजी मंत्री तथा कारखाना संचालक आ. अमित विलासरावजी देशमुख साहेब,लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासरावजी देशमुख साहेब यांच्या हस्ते विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर संपन्न झाला. यावेळी माजी आमदार त्र्यंबक भिसे,राज्य साखर संघाचे संचालक आबासाहेब पाटील, जिल्हा बँकचे माजी चेअरमन श्रीपतराव काकडे, रेणाचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील, मांजराचे व्हा चेअरमन श्रीशैल उटगे,लातूर बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, जिल्हा बँकेचे व्हा चेअरमन प्रमोद जाधव,२१ शुगरचे व्हा. चेअरमन विजय






देशमुख,विलास कारखान्याचे व्हा.चेअरमन रविंद्र काळे, संतशिरोमणी कारखान्याचे चेअरमन गणपतराव बाजूळगे, व्हा.चेअरमन शाम भोसले,मांजराचे सर्व संचालक तसेच राजकुमार पाटील,सचिन सुर्यवंशी, संभाजी रेड्डी,संभाजी सुळ, चांदपाशा इनामदार, सुपर्ण जगताप,कार्यकारी संचालक पंडित देसाई,विलास कारखान्याचे कार्यकारी संचालक संजीव देसाई याची उपस्थिती होती.

यावेळी मनोगत व्यक्त करत असताना सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब म्हणाले की, मांजरा कारखान्याने दैनंदिन गाळप क्षमता विस्तार केल्याने शेतक-यांचा ऊस तत्परतेने गाळप होण्यासाठी मदत होणार आहे. साखरे सोबतच उपपदार्थ निर्मितीतून शेतकऱ्यांना अधिकचा दर देण्यासाठी आपण कटीबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी बॉयलर अग्नी प्रदीपनासाठी कारखान्याचे संचालक वसंतराव ऊफाडे यांच्या हस्ते सपत्नीक पुजन झाले तसेच गळीत हंगामासाठी संचालक नवनाथराव काळे यांच्या हस्ते सपत्नीक विधीवत पुजन संपन्न झाले.यावेळी शेतकरी सभासद, कारखाना खाते प्रमुख, अधिकारी,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा अत्यंत उत्साहात साजरा

मुंबई /प्रतिनिधी : – मिरा भाईंदर येथे कार्यरत असलेल्या धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार मिरा,भाईंदर व्यवस्थापन समितीच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तनदिन तथा धम्मदीक्षा वर्धापन दिन सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पारंपारिक धम्म रॅली काढण्यात आली. बुद्धमूर्ती, भिक्खू संघ व बौद्ध उपासक ,उपासिका यांचा सहभाग असलेल्या रॅलीनध्ये लेझिम पथकाने आपली कला सादर करून सर्वांची मने जिंकून घेतली. धम्म सम्राट अशोक बुध्द विहार येथील सामूहिक बुद्ध पूजेनंतर मुख्य सभागृहामध्ये भंते कीर्तीपियो नागसेन थेरो यांनी धम्मदेसना दिली. तसेच प्रा. मेघा नगराळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराची कारणे या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. धम्मचक्र प्रवर्तनदिन दिनानिमित्त आयोजित केलेल्या चित्रकला व निबंध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. नेहा चक्रपाणी या विद्यार्थिनीचा विक्रीकर निरीक्षक म्हणून परीक्षा पास झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. मिरा भाईंदर मधील गायक कलाकारांनी त. बुद्ध धम्म व डॉ बाबासाहेब आंबेडकर यावर आधारीत काव्य, गायन सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. आमदार गीता जैन यांनीही यावेळी उपस्थित राहून धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच माजी नगरसेवक अनंत शिर्के व भाईंदर मधील विविध सामाजिक, धार्मिक, राजकीय तथा सांस्कृतिक संस्था संघटनांमध्ये कार्यरत असलेले विविध संस्थांचे पदाधिकारी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. मीरा भाईंदर मधील बौद्ध जनतेने या कार्यक्रमाचा पूर्ण आस्वाद घेतला आणि अशाच प्रकारचे विविध कार्यक्रम धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार व्यवस्थापन समितीने करावेत, अशी मंगल कामना व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्रा. उत्तम भगत यांनी भूषविले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री कराडकर यांनी प्रास्ताविक राजेश बडेकर यांनी केले व आभार विलास जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी धम्म सम्राट अशोक बुध्द विहार व्यवस्थापन समितीचे महानंद बडगे, प्रा. सुनिल धापसे, दिलीप सुरडकर, तिलोत्तमा वाळके, सुभाष ठोंबरे, विलास जाधव , सुनिल जाधव, नरेश मोहिते यांनी व लहू तायडे, सुनिल कंटे, सचिन शिंदे, महेंद्र मोहिते, वर्षा बडेकर, प्रदीप कांबळे, राहुल खिल्लारे, प्रेरणा गोखले, प्रा. भीमराव काकडे, जयदीप बनसोडे, सिद्धार्थ इंगळे, सिद्धार्थ वानखेडे, प्रा. विनोद बाजड, ड. सुदाम भगत आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मिरा भाईंदर परिसरातील धम्म बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दहशतवाद विरोधी शाखा,लातूर व स्थानिक गुन्हे शाखे ची संयुक्त कारवाई, ३ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल

लातूर :- दहशतवाद विरोधी शाखा,लातूर व स्थानिक गुन्हे शाखे ची संयुक्त कारवाई वाहनासह ०९ लाख ३१ हजार रुपयाचा ३.२ घस.गांजा जप्त. ३ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल. या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्याकरिता जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने लातूर पोलीसाकडून अवैध धंद्यावर कारवाई करण्याची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

दरम्यान पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर स्थानिक गुन्हे शाखा लातूर व दहशतवाद विरोधी शाखा, लातूर च्या संयुक्त पथकाने दिनांक २४/१०/२०२३ रोजी मध्यरात्री गांजाची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी वाहतूक करीत असलेल्या कार क्रमांक एम एच २४ एडब्ल्यू ९३४० कारला गांजाची अवैध वाहतूक करणाऱ्या कारचा पाठलाग करून नवीन रेनापुर नाका परिसरात ताब्यात घेऊन कार मधील लोकांना विचारपूस करून कारची झडती घेतली असता त्यामध्ये पांढऱ्या रंगाच्या खाताच्या पोत्यात गाडीच्या डिग्गी मध्ये लपून ठेवलेले ३.२१५ किलोग्राम प्रतिबंधित बी मिश्रित गांजा जप्त करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा व दहशतवाद विरोधी शाखा,लातूर यांनी पाठलाग करून ताब्यात घेतलेल्या कार मध्ये प्रतिबंधित गांजा आढळून आल्याने तो कारसह जप्त करण्यात आला असून पोलीस ठाणे, विवेकानंद चौक येथे गुन्ह्यातील आरोपी नामे

शरीफ लतीफ शेख, वय ३५ वर्ष, राहणार कॉईल नगर, लातूर,

वसीम बाबूलाल अत्तार, वय २६



वर्ष, राहणार बस स्टॅन्ड जवळ धर्मापुरी तालुका परळी जिल्हा बीड,

ईश्वर नवनाथ फड, राहणार धर्मापुरी तालुका परळी (फरार)

यांचे विरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ६३७/२०२३ कलम ८ (क), २० (ब) २९ गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम (छज्झड -लीं ) १९८५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्याकडून चोरटी विक्री व्यवसायासाठी बी मिश्रित गांजा, वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेली कार व इतर साहित्य असा एकूण ९ लाख ३१ हजार ८२५ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास विवेकानंद चौक पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.

पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांच्या आदेशावरून जिल्ह्यात अवैध व्यवसाय करणाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर धाडी मारुन कार्यवाही करण्याचे सत्र सुरु आहे. याचाच एक भाग म्हणून दिनांक २४/१०/२०२३ रोजी पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील स्थानिक गुन्हे शाखा व दहशतवाद विरोधी शाखा यांच्या संयुक्त पथकातील पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड, पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख, सहाय्यक फौजदार उत्तम जाधव, अंगद कोतवाड, पोलीस अमलदार संपत फड, मोहन सुरवसे, नाना भोंग, सचिन धारेकर, सचिन मुंडे, नकुल पाटील, संजय काळे, चंद्रकांत केंद्रे, राहुल सोनकांबळे,पोलीस फोटोग्राफर सुहास जाधव, धनंजय गुट्टे यांनी सदरची कामगिरी केली आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी,०६ मोटरसायकलसह २ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त. ५ गुन्हे उघडकीस, २ आरोपी अटक

लातूर :- स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी,०६ मोटरसायकलसह २ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त. ५ गुन्हे उघडकीस, २ आरोपी अटक* या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस स्टेशनला दाखल असलेल्या विशेषतः मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता विशेष पथके स्थापन करून गुन्हे उघड करण्याचे प्रयत्न सुरू होते.




त्या अनुषंगाने सदर पथके माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक २३/१०/ २०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार नामे ऋषिकेश मधुकर चव्हाण नवीन रेनापुर नाका परिसरात फिरत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर पथक तात्काळ नवीन रेनापुर नाका परिसरात पोचून रोडवर हिरो होंडा स्प्लेंडरसह थांबलेल्या इसमाला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव ऋषिकेश मधुकर चव्हाण वय २३ वर्ष, राहणार नांदगाव तालुका अंबाजोगाई जिल्हा बीड असे असल्याचे सांगितले,

तसेच त्यांच्या ताब्यात असलेल्या वाहना संदर्भाने विचारपूस केली असता सांगितले कि, सदरची स्प्लेंडर मोटर सायकल काही दिवसापूर्वी लातूर शहरातून चोरी केलेली आहे. तसेच लातूर शहरातील विविध ठिकाणाहून त्याच्या आणखीन साथीदार नामे शंभुराजे सतीश महाजन,वय २४ वर्ष, राहणार शिराढोण, तालुका कळंब, जिल्हा धाराशिव.

यांच्यासोबत मिळून मोटारसायकली चोरी केल्याचे सांगितले. त्यावरून गुन्ह्यातील नमूद आरोपीला ताब्यात घेऊन त्यांनी लातूर शहरातील विविध पोलीस स्टेशनच्या हद्दीतून चोरी केलेल्या मोटारसायकल बाबत विचारपूस करुन नमूद आरोपीकडून चोरीच्या आणखीन इतर ५ अशा मिळून एकूण सहा विविध कंपनीच्या मोटारसायकली ज्याची एकूण किंमत २ लाख १५ हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

मोटार सायकल चोरीचे पोलीस ठाणे शिवाजीनगर येथील मोटार सायकल चोरीचा एक , एमआयडीसी पोलीस ठाणे मधील मोटरसायकल चोरीचे तीन गुन्हे व औसा पोलीस ठाण्याला दाखल असलेला मोटरसायकल चोरीचा एक गुन्हा असे एकूण ०५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. पुढील कार्यवाहीस्तव नमूद आरोपींना पोलीस ठाणे एमआयडीसी च्या ताब्यात देण्यात आल्या असून संबंधित पोलीस ठाणेचे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड, पोलीस अंमलदार माधव बिल्लापट्टे, नवनाथ हासबे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, राजाभाऊ मस्के, तुराब पठाण, जमीर शेख, संतोष खांडेकर, नकुल पाटील यांनी पार पाडली.

# शब्दसुगंध या शरदा प्रकाश ठाणे यांनी प्रकाशित केलेल्या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळा संपन्न

ठाणे / प्रतिनिधी :- सतत दुसऱ्यांसाठी कार्यरत असणाऱ्या पोलिसांमध्ये प्रचंड प्रतिभाशक्ती आहे.चोवीस तास कार्यमग्न असल्यामुळे अनेक पोलीस व्यक्त होत नाहीत. पोलीस खात्यातील कवी नारायण गाडेकर यांच्यासारखे काहीजण मात्र कवितेतून व्यक्त होतात. अश्यावेळी त्यांच्या प्रतिभाशक्तीला समजून घेऊन त्यांना प्रोत्साहन द्यायला हवे.असे आवाहन कवी अरुण म्हात्रे यांनी व्यक्त केले. शारदा प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या कवी नारायण निवृत्ती गाडेकर यांच्या शब्दसुगंध या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहोळ्यात अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उप आयुक्त पुरुषोत्तम कराड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांतीलाल कोथिंबीरे , कवी नारायण गाडेकर, प्रकाशक डॉ. संतोष राणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

शब्दसुगंध काव्यसंग्रहातील कवितांचे विशेष कौतुक करून कवी अरुण म्हात्रे पुढे म्हणाले, शेतात रमणारी ,सामाजिक बांधिलकी मानणारी, कर्तव्यनिष्ठ असणारी, आईवडिलांचे ऋण व्यक्त करणारी नारायण गाडेकर यांची कविता पोलीस खात्याची मान उंचावणारी आहे. सव्वीस जुलैचा हल्ला आणि कोरोना




या काळात पोलिसांनी स्वतःच्या जीवाजी बाजी लावून आपल्या सगळ्यांची काळजी घेतली. उन्हातान्हात ,पावसात कश्याचीही पर्वा न करता पोलीस आपली सर्वांची काळजी घेत होते. अनेक पोलीस संवेदनशील असून ते मनातल्या मनात व्यक्त होत असतात.अश्या प्रतिभावंत पोलिसांची प्रतिभाशक्ती समजून घ्यायला हवी. पोलीस खात्यात अनेक अधिका ऱ्यांनी कथा,कविता, कादंबरी ,आत्मचरित्र असे विविध साहित्यप्रकार लिहून स्वतःला व्यक्त केले आहे. कवी नारायण गाडेकर यांना कविता समजलेली असून अतिशय नेमक्या शब्दात त्यांनी स्वतःला व्यक्त केले आहे.या कवितासंग्रहामुळे पोलीस खात्यात चैतन्य निर्माण होईल. पोलीस खात्यातील लेखक – कवीना बळ मिळेल ,असा मला विश्वास वाटतो.

पोलीस उप आयुक्त पुरुषोत्तम कराड म्हणाले की, पोलीस खात्यातील नारायण गाडेकर यांचा काव्यसंग्रह प्रकाशित होणे ही पोलीस खात्यासाठी अतिशय आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. या ड्युटीमध्ये काही सूचणं आणि ते कागदावर लिहून काढणे ही तारेवरची कसरत नारायण गाडेकर यांनी अतिशय प्रगल्भपणे केली आहे. असे सहकारी पोलीस खात्याची मान नेहमीच उंचावतात.

आपल्या सोबत काम करणारा सहकारी लिहित असतो ,जमेल तसे वाचत असतो. पण जेव्हा शब्दसुगंध सारखा दर्जेदार, वाचनीय कवितसंग्रह प्रकाशित होतो. तो खरोखरच आनंदाचा क्षण असल्याचे गौरोदगार वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांतीलाल कोथिंबीरे यांनी काढले.

मनोगत व्यक्त करताना कवी नारायण गाडेकर म्हणाले, मी शेतकऱ्याचा मुलगा आहे.त्यामुळे मातीचे दुःख मला शेतात राबताना कळले. पाऊस आला नाही म्हणून माझ्या वडिलांच्या डोळ्यात अश्रूंचा पाऊस मी पाहिला. त्याचवेळी माझ्या कवितेने जन्म घेतला. पोलीस खात्यात असल्यामुळे समाजाच्या वेदना ,दुःख अधिक संवेदनशिलपणे कागदावर उतरवू शकलो. माझे कौतुक करणारे वरिष्ठ, सत्याच्या वाटेवर चालायला शिकविणारे आईवडील, आणि माझ्यातील कवीला जपणारी पत्नी यांच्यामुळे मी इथपर्यंत पोहोचू शकलो. यावेळी स्वर्गीय निवृत्ती गाडेकर यांच्या स्मरणार्थ डॉ. प्रकाश जंगले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार तर लेखक अमोल मोहन निरगुडे यांना साहित्य सेवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अस्मिता येंडे यांनी सूत्रसंचालन् केले तर डॉ.संतोष राणे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या प्रकाशन सोहळ्यास पोलीस खात्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंबेडकर पार्क आणि नालंदा बुद्ध विहारात ६७वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्साहात संपन्न

लातूर :- लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंबेडकर पार्क आणि नालंदा बुद्ध विहार, प्रकाश नगर येथे ६७वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्ध उपासक-उपसिकांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहन भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर तथागत भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. भिक्खू पय्यानंद थेरो यांनी धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाचे महत्व सांगितले. यावेळी अनिरुध्द बनसोडे, ज्योतीराम लामतुरे, उदय सोनवणे, आशाताई चिकटे, सरिता बनसोडे, मिलिंद धावारे, अर्चना जाधव, उत्तम कांबळे, मधुकर शृंगारे, सुरेश सोनकांबळे, टी . एस. कांबळे, ज्ञानेश्वर सुरवसे, बाबुराव बनसोडे, अण्णाराव सोनवणे, मारोती आपटे, अनिरुद्ध बनसोडे, शशिकला सुरवसे, आशा उडानसिंग, वत्सला परमेश्वरे, विद्या आल्टे, करुणा सूर्यवंशी, सुनीता धाकडे, माया टिळक, मंगल चिलवंत आदीची उपस्थिती होती.







६७ वा धम्मचक्र प्रवर्तन व अशोका विजया दशमी दिना निमित्ताने संकल्प बुद्ध विहार अदई गाव पनवेल येथे मनोरे परिवाराकडून महामानव बोधिसत्व प. पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतीमा भेट म्हणून देण्यात आल्या त्या वेळचे क्षणचित्र.

# बांधकाम कामगारांचे मुंबई बांद्रा कल्याणकारी मंडळासमोर जोरदार धरणे आंदोलन!

मुंबई / प्रतिनिधी :- महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने २५ ऑक्टोबर रोजी मुंबई बांद्रा येथील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कार्यालयासमोर सकाळी ११ ते दुपारी तीन वाजेपर्यंत जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्रातील सध्या ३५ लाख नोंदीत बांधकाम कामगारांच्यापैकी वीस लाख बांधकाम कामगारांचे सर्व प्रलंबित अर्ज ताबडतोब निकाली काढा !महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावर कामगार संघटनांचे प्रतिनिधी नेमा! महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांच्या साठी मंडळाने घोषित केल्यानुसार घर बांधणी योजना त्वरित राबवा. महाराष्ट्रातील नोंदीत बांधकाम कामगारांच्या दोन मुलीच्या विवाहसाठी प्रत्येकी ५१ हजार रुपये आर्थिक सहाय्य द्या. महाराष्ट्रातील सर्व बांधकाम कामगार एकजुटीचा विजय असो! इत्यादी घोषणा धरणे आंदोलनामध्ये जोरदारपणे देण्यात आल्या या महत्त्वाच्या धरणे आंदोलनामध्ये महिला बांधकाम कामगारांची संख्या लक्षणीय होती.

ठीक दुपारी साडेबारा वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सचिव विवेक कुंभार यांना शिष्टमंडळाच्या वतीने निवेदन देण्यात आले. शिष्टमंडळाच्या वतीने बोलताना कॉ शंकर पुजारी यांनी सांगितले की सर्व प्रलंबित अर्ज त्वरित मंजूर करावेत. घोषित केल्यानुसार बांधकाम कामगारांची घरबांधणी योजना त्वरित राबवावी. कामगारांची नोंदणी व नुतनीकरण सुलभ करावी. यासंदर्भात बोलताना बांधकाम कल्याणकारी मंडळाचे सचिव श्री विवेक कुंभार यांनी स्पष्ट केले की,सध्या महाराष्ट्रामध्ये जे सर्व प्रलंबित बांधकाम कामगारांचे अर्ज आहेत ते सर्व अर्ज ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत तपासून पूर्ण निकाली करण्यात येणार आहेत.असे ठोस आश्वासन बांधकाम कल्याणकारी मंडळाचे सचिव विवेक कुंभार यांनी दिले. त्यांनी असेही सांगितले की नवीन नोंदणीची प्रक्रिया अत्यंत सोपी केलेली असून फक्त आधार कार्ड वर कामगारांची नोंदणी करण्यात येईल. बांधकाम कामगारांच्या घरकुल योजनेबद्दल त्यांनी सांगितले की याबाबत बांधकाम कल्याणकारी मंडळाने नुकतेच नियम केले असून डायरेक्ट घर बांधणीचे दोन लाख रुपये बांधकाम कामगारांना शहरी व ग्रामीण भागात देण्यात येतील. नोंदीत बांधकाम कामगारांच्या दोन मुलींना आर्थिक सहाय्य देणे बरोबर आहे असे सांगून याबाबत शिफारस करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. इतर मागण्या संबंधी बोलताना त्यांनी स्पष्ट केले





की या मागण्या शासन पातळीवरील असल्यामुळे या मागण्या शासनाकडे त्वरित पाठवण्यात येतील. शिष्टमंडळात कॉ शंकर पुजारी,साथी सागर तायडे, साथी सुरेश पाटील,कॉ रमेश जाधव, कॉ सुनील पाटील, साथी विनिता बाळेकुंदरी, श्री दीपक थोरात,कॉमेड संभाजी भैरे,कॉम्रेड विशे,.आयु धनंजय वाघमारे, कॉ कुट्टी,आयु पदमाकर अहिरे,योगिता घाडगे,विजय दाभाडे,बेबी नाईक, स्वाती खिलारी यादींनी सहभाग घेऊन विविध समस्या मांडल्या. शिष्टमंडळाबरोबर चर्चा झाल्यानंतर कल्याणकारी मंडळाच्या ऑफिस समोर झालेल्या सभेमध्ये कॉ शंकर पुजारी,साथी सागर तायडे, साथी सुरेश पाटील,कॉ रमेश जाधव, कॉ सुनील पाटील, साथी विनिता बाळेकुंदरी, श्री दीपक थोरात,कॉमेड संभाजी भैरे,कॉम्रेड विशे ठाणे ,कॉ.उस्मान शेख,आयु. धनंजय वाघमारे, कॉ कुट्टी,आयु पद्माकर अहिरे नंदकुमार महाडिक रविंद्र सूर्यवंशी इत्यादींची भाषणे झाली.या आंदोलनामध्ये विविध संघटनांचे कामगार प्रतिनिधीक स्वरूपात उपस्थित होते, त्यात कर्जत,खपोली,उल्हासनगर, कल्याण बदलापूर ठाणे,पालघर,रायगड,औरंगाबाद,परभणी, सांगली, कोल्हापूर,मुंबई,नवी मुंबई, येथून इमारत बांधकाम कामगार आणि आदिवासी भागातील महिलांची लक्षवेधी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सागर रामभाऊ तायडे यांस कडून

# महात्मा बसवेश्वरमध्ये गणेश शिंदे आणि कैवल्य पांचाळ यांचा सत्कार

लातूर :- येथील महात्मा बसेश्वर महाविद्यालयातील संगीत व सांस्कृतिक विभागाचे विद्यार्थी गणेश शिंदे आणि कैवल्य पांचाळ यांची इंद्रधनुष्य २०२३ आंतरविद्यापीठीय राज्यस्तरीय युवक महोत्सवासाठी नुकतीच निवड झाली त्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई आणि उपप्राचार्य डॉ. राजकुमार लाखादिवे यांच्या हस्ते शाल आणि पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. दीपक चाटे, डॉ. रत्नाकर बेडगे प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार आणि रोहित कुंभार यांची उपस्थिती होती. हा युवक महोत्सव दि. ०५ ते ०९ नोव्हेंबर २०२३ या कालावधीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आला आहे. सदरील युवक महोत्सवात स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेडच्या लोकसंगीत या कलाप्रकाराकरिता महाविद्यालयातील गणेश शिंदे आणि कैवल्य पांचाळ या विद्यार्थ्यांची विद्यापीठाकडून निवड करण्यात आलेली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शिवशंकरप्पा बिडवे, उपाध्यक्ष मा. माधवराव पाटील (तपसेचिंचोलीकर), सचिव मा. मन्मथप्पा लोखंडे व इतर सर्व सन्माननीय संचालक मंडळातील पदाधिकारी, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अभिनंदन करून पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.



# धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा अत्यंत उत्साहात साजरा

मुंबई /प्रतिनिधी : - मिरा भाईंदर येथे कार्यरत असलेल्या धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार मिरा,भाईंदर व्यवस्थापन समितीच्या वतीने धम्मचक्क पवत्तन दिन तथा धम्मदीक्षा वर्धापन दिन सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पारंपारिक धम्म रॅली काढण्यात आली. बुद्धमूर्ती, भिक्खू संघ व बौद्ध उपासक ,उपासिका यांचा सहभाग असलेल्या रॅलीनध्ये लेझिम पथकाने आपली कला सादर करून सर्वांची मने जिंकून घेतली. धम्म सम्राट अशोक बुध्द विहार येथील सामूहिक बुद्ध पूजेनंतर मुख्य सभागृहामध्ये भंते कीर्तीपियो नागसेन थेरो यांनी धम्मदेसना दिली. तसेच प्रा. मेघा नगराळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराची कारणे या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. धम्मचक्क पवत्तन दिनानिमित्त आयोजित केलेल्या चित्रकला व निबंध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. नेहा चक्रपाणी या विद्यार्थिनीचा विक्रीकर निरीक्षक म्हणून परीक्षा पास झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. मिरा भाईंदर मधील गायक कलाकारांनी त. बुद्ध, धम्म व डॉ बाबासाहेब आंबेडकर यावर आधारीत काव्य, गायन सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. मा. आमदार गीता जैन यांनीही यावेळी उपस्थित राहून धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच माजी नगरसेवक अनंत शिर्के व भाईंदर मधील विविध सामाजिक, धार्मिक, राजकीय तथा सांस्कृतिक संस्था संघटनांमध्ये कार्यरत असलेले विविध संस्थांचे पदाधिकारी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. मीरा भाईंदर मधील बौद्ध जनतेने या कार्यक्रमाचा पूर्ण आस्वाद घेतला आणि अशाच प्रकारचे विविध कार्यक्रम धम्म सम्राट अशोक बुद्ध विहार व्यवस्थापन समितीने करावेत, अशी मंगल कामना व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्रा. उत्तम भगत यांनी भूषविले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री कराडकर यांनी प्रास्ताविक राजेश बडेकर यांनी केले व आभार विलास जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी धम्म सम्राट अशोक बुध्द विहार व्यवस्थापन समितीचे महानंद बडगे, प्रा. सुनिल धापसे, दिलीप सुरडकर, तिलोत्तमा वाळके, सुभाष ठोंबरे, विलास जाधव , सुनिल जाधव, नरेश मोहिते यांनी व लहू तायडे, सुनिल कंटे, सचिन शिंदे, महेंद्र मोहिते, वर्षा बडेकर, प्रदीप कांबळे, राहुल खिल्लारे, प्रेरणा गोखले, प्रा. भीमराव काकडे, जयदीप बनसोडे, सिद्धार्थ इंगळे, सिद्धार्थ वानखेडे, प्रा. विनोद बाजड, ड. सुदाम भगत आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला मिरा भाईंदर परिसरातील धम्म बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया शाखा जुईनगर येथे ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी शानदार धम्म दीक्षेचा सोहळा उत्साहात संपन्न

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया शाखा जुईनगर येथे ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनी शानदार धम्म दीक्षेचा सोहळा उत्साहात संपन्न

२४ ऑक्टोबर रोजी मुलगंध कुटी बुध्द विहार चिंचोली तलाव सेक्टर २५ जुईनगर येथे धम्म दिक्षेचा शानदार सोहळा संपन्न झाला. सर्व प्रथम आपले आदर्श तथागत भगवंत गौतम बुद्ध, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना मुलगंध कुटी बुध्द विहाराचे संस्थापक अध्यक्ष महेशजी खरे यांच्या हस्ते पुष्प व आगर बत्ती दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. शाखेचे अध्यक्ष समाज भुषण, बौध्दाचार्य बी.सी.सोनावले यांनी प्रास्ताविक केले. शाखेच्या हिशेब तपासनीस अॅड. जानकी आनंद यांनी भंते धम्मानंद यांना चैत्यभूमी वरुन कार्यक्रम स्थळी सुखरूप पणे आणले होते भंते धम्मानंद यांचे आगमन होताच यथा योग्य स्वागत केले. पुजेचे औचित्य पुर्ण करून, भंतेंना याचना करून, भंतेंजीकडून पंचशिल ग्रहण करून रीतसर धम्म दीक्षेच्या विधिला सुरवात केली. शाखा अध्यक्ष बी.सी. सोनावले यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर का केले ? आपण धम्म दीक्षा का ? घ्यावी, व धम्म दीक्षेचे फायदे काय आहेत ? या विषयावर भंतेजीनी २२ प्रतिज्ञा वदवून घेतल्या नंतर त्रिशरणासह पंचशिल देऊन धम्म देशना दिली. शाखेचे दानदाते व शुभेच्छुक विरेंद्र लगाडें यांनी आपल्या कुटुंबा समवेत बौद्ध धम्माची दिक्षा घेतली. सुनील सामंत, विजय साळे, चंद्रकांत जगताप, यांनी प्रत्यक्ष भेट देऊन, शुभेच्छा दिल्या तर माजी नगरसेवक विशाल ससाणे यांनी अप्रत्यक्ष उपस्थित राहून दान व शुभेच्छा दिल्या. त्या प्रसंगी रविंद्र सावंत यांचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी जनादेश या टीव्ही चॅनलची व्यवस्था केली होती. या कार्यक्रमास महीलांची जास्त प्रमाणात उपस्थित होती शेवटी सरणंतय घेऊन कार्यक्रमाची सांगता केली. विहाराचे व्यवस्थापक कॅटरर्स हेमंत मोहिते यांनी भोजन व्यवस्था करून मोलाचे सहकार्य केले, त्यांचे ही आभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.





PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE